छत्रपती संभाजीनगर । बीड । परभणी । लातूर । धाराशिव । नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित होणार दैनिक

दैनिक

बीड, छत्रपती संभाजीनगर,लातूर, धाराशिव, परभणी, जालना,नांदेड

# मराठवाडा दर्शन

मराठवाड्याचे प्रत्येक घडामोडीचे दर्पण

Mo.9028349999

E-Mail : marathwadadarshannews@gmail.com

MARATHWADA DARSHAN

संपादक : दत्तात्रय बालासाहेब हंडीबाग

प्रतिनिधी पाहिजेत


" दैनिक मराठवाडा दर्शनसाठी "
मराठवाड्यातील सर्व जिल्हे
तालुका, गावस्तरावर
प्रतिनिधी नेमणे आहेत.
:: संपर्क ::
MO.9028349999

बीड (महाराष्ट्र) । दैनिक । मराठी । वर्ष -०२ । अंक -२४४ । रविवार दि.१८ मे २०२५ । आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७७८५ । किंमत ३ रू । पाने ४

Beed (Maharashtra) DAILY MARATHI Year-02 Issue -244 SUNDAY DT.18 MAY 2025 RNI : MAHMAR/2023/87785 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# सोलापूरमध्ये टॉवेल कारखान्याला भीषण आग

## तीन कामगारांचा होरपळून मृत्यू, ५-६ जण अडकले



सोलापूर /प्रतिनिधी

मध्यरात्रीच्या सुमारास सोलापूर एमआयडीसी परिसरातील सेंट्रल इंडस्ट्री या कारखान्याला लागलेल्या आगीने थैमान घातले. या आगीत आतापर्यंत ३ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला असून, ३ जण गंभीर जखमी अवस्थेत बाहेर काढण्यात आले आहेत. अजूनही ५ ते ६ जण अडकले असावेत, अशी माहिती घटनास्थळी असलेल्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

दरम्यान आगीची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहे. आग नेमकी कशामुळे लगली, याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

२ फायरमॅन किरकोळ जखमी

मिळालेल्या माहितीनुसार ही दुर्घटना रात्री ३ वाजण्याच्या सुमारास घडली. अक्कलकोट रोडवरील एमआयडीसी परिसरात असलेल्या 'सेंट्रल इंडस्ट्री'मध्ये ही आग भडकली. कारखान्यात मोठ्या प्रमाणात साहित्य साठवलेले असल्याने आग पसरली.

सोलापूर महानगरपालिका आणि एमआयडीसीमधील अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले असून, आग विझविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

# मान्सूनची प्रगती वेगाने! पुढील ५ दिवस पावसाचे



मुंबई : नैऋत्य मोसमी वारे अर्थात मान्सूनने आणखी काही भागात प्रगती केली आहे. शनिवारी मान्सूनने दक्षिण अरबी समुद्राचा काही भाग, मालदीव आणि कोमोरिन भाग, दक्षिण बंगालचा उपसागर, अंदमान बेटांचा उर्वरित भाग आणि अंदमान समुद्र; तसेच पूर्व-मध्य बंगाल उपसागराचा काही भाग व्यापला आहे.

पुढील ४-५ दिवसांत दक्षिण अरबी समुद्राच्या काही भागांत, मालदीव आणि कोमोरिन भाग, दक्षिण बंगालच्या उपसागराचा आणखी काही भाग; मध्य बंगालच्या उपसागराच्या काही भागात आणि ईशान्य बंगाल उपसागराच्या काही भागात मान्सून दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. दुसरीकडे, वायव्य भारतातील काही भागात तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यात मान्सूनपूर्व पाऊस सुरुच आहे. राज्यात पुढील ४ ते ५ दिवसांत सर्व दूर हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वाऱ्यासह (५०-६० किमी प्रतितास वेग) मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडणार असल्याचे मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने म्हटले आहे.

कोल्हापूरमध्ये शनिवारी जोरदार आणि तेथून पुढे ३ दिवस २० मे पर्यंत हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडू शकतो. तर २१ मे रोजी काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. सातारा आणि जिल्ह्याच्या घाट भागात आज, उद्या जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सांगली, सोलापूर जिल्ह्यात रविवारी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले आहे.

# सर्वांसाठी घरे योजनेबाबत शासन कटीबद्ध - मुख्यमंत्री




नागपूर : नागपूर महानगरामध्ये अनेक वर्षांपासून स्वत:च्या मालकी हक्काचे घर व्हावे अशी ईच्छा हजारो झोपडपट्टीधारकांची आहे. यापासून वंचित असलेल्या लोकांना पट्टे वाटपाच्या माध्यमातून हक्काचे घर मिळत आहेत. निकषाची पुर्तता करणारा एकही व्यक्ती हक्काच्या घरांपासून वंचित राहणार नाही. जे झोपडपट्टीधारक शासनाच्या निकषात मोडतात त्यांनी आपल्या हक्काच्या घरासाठी महानगरपालिका, नझूल विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हैदराबाद हाऊस येथे आयोजित जनता दरबाराचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ७ वेगवेगळया झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या २१ झोपडपट्टी धारकांना प्राथमिक स्वरुपात पट्टे वाटप करून झाला. यानंतर त्यांनी जनतेची निवेदने स्विकारली. यावेळी विधान परिषद सदस्य संदिप जोशी, आमदार प्रवीण दटके, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीणा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, प्रभारी जिल्हाधिकारी प्रदीप कुलकर्णी, महामेट्रोचे महाव्यवस्थापक अनिल कोकाटे, आदी यावेळी उपस्थित होते.

सर्वांसाठी घरे योजना-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने नागपुर शहरामधील नझुलच्या जागेवरील ३३ झोपडपट्टीच्या प्रस्तावातील ३ हजार ७१४ झोपडपट्टी धारकांचे अतिक्रमण नियमानुकुल करण्यात आले आहे. आजवर मंजुर पट्टेपैकी २१५७ पी.टी.एस झोपडपट्टी धारकांना चलान देण्यात आलेले आहेत. परंतु सदर अकृषीक आकारणीची रक्कम चलानव्दारे भरणा केलेली नसल्याने वाटप करण्यास शिल्लक आहे. याबाबत शिबीर घेवून कार्यवाही केली जात आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय (महसुल विभाग) नागपूर कडुन १८ झोपडपट्टी पैकी तुकडोजी नगर, कामगार कॉलनी, भांडेवाडी या ३ झोपडपट्टयामध्ये एकुण १६० झोपडपट्टी धारकांना पट्टे वाटप करण्यात आले आहेत. ४७४ संबधित पट्टेधारकांनी चलानाची रक्कम शासन जमा केल्यानंतर पट्टा वाटप करण्यात येईल. याबाबत दिनांक २०.५.२०२५ रोजी शिबीर आयोजीत करण्यात येणार असल्याचे जिल्हा प्रशासनाने सांगितले.

उर्वरित चिंचभुवन, शामनगर, गिट्टीखदान, पन्नालाल देशराज नगर, आदिवासी नगर, पुनापुर, वाठोडा, भरतवाडा, हुडकेश्वर, कुराडपुरा, शोभाखेत, बिनाकी, कोष्टीपुरा, ठक्करग्राम व नारागाव या १५ झोपडपट्टीमध्ये ११२१ पट्टे वाटप करणे शिल्लक आहे. त्यापैकी २ झोपडपट्टी मध्ये पट्टे वाटपासाठी दिनांक १९ मे २०२५ रोजी जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजीत करण्यात आलेली आहे.



सोयगाव /सुनील चोरमले

दिनांक १७ मे २०२५ रोजी बहुरे वस्ती (देऊळगाव बाजार) येथील युवक व नागरिकांनी सिल्लोड काँग्रेस तालुकाध्यक्ष भास्करराव घायवट पाटील यांच्या हस्ते व मार्गदर्शनात तसेच जिल्हा सरचिटणीस एकबाल अहमद सर यांच्या प्रमुख उपस्थितीत काँगेस पक्षात प्रवेश केला. यावेळी पुढील युवक व नागरिकांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

१ रंगनाथ संपत आमटे २ प्रेमसिंग पाकळ ३ पप्पूसिंग बहुरे ४ नारायण बहुरे ५ मनसाराम बहुरे ६ उपलसिंग बहुरे ७ सुनील चरावंडे ८ चंदन चरावंडे ९ देवीसिंग बहुरे १० आमसाराम बहुरे ११ माधवराव आमटे १२ बाबुराव आमटे १३ माणिकराव आमटे १४ अन्साराम आमटे १५ बाजीराव आमटे १६ सागर आमटे १७ आदित्य चरावंडे १८ सचिन चरावंडे १९ चंदन बहुरे २० सुदाम बहुरे २१ करण बहुरे २२ अर्जुन बहुरे २३ कार्तिक बहुरे २४ संतोष बहुरे यांच्यासह असंख्य युवक व नागरिकांनी प्रवेश केला. यावेळी सेवादल तालुका अध्यक्ष संजय जाधव, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख सलीम, अल्पसंख्यांक अजिंठा सर्कल अध्यक्ष युनूस सौदागर यांसह कार्यकर्ते,पदाधिकारी, गावकरी व युवक उपस्थित होते.

# शिवभोजन केंद्राची चौकशी करण्याची मागणी



नांदेड ( जि.प्र.)

शिवभोजन केंद्रात बोगस लाभार्थी दाखवून मोठ्या प्रमाणात केंद्रचालक भष्टाचार करत आहेत. शिवभोजन केंद्राची चौकशी करून केंद्र चालकावर कारवाई करण्याची मागणी डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्य महानगराध्यक्ष नकूल जैन यांनी अन्न नागरी पुरवठा, राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्य सरकारने सर्व सामान्य व गोरगरीब नागरिकांसाठी शिवभोजन केंद्र सुरू केले आहे. पण शिवभोजन केंद्रात भष्टाचार होत आहे. बोगस लाभार्थी दाखवून बिले उचलण्यात येत आहेत. असे अनेक बोगस बिले नांदेड जिल्ह्यात उचलण्यात आली आहेत. असा प्रकार राज्यात सुरू आहे.अनेक शिवभोजन चालक राज्य शासनाच्या नियम व अटीनुसार नागरिकांना सुविधा देत नाहीत. अनेक ठिकाणी निकृष्ट भोजन दिले जाते. सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक आहे पण लावले जात नाहीत.काही शिवभोजन केंद्र बंद आहेत. पण त्यांचे बिले बनवून मंजूर केले जातात. यात लाखो रुपयांचा भष्टाचार होतो, असाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

पुरवठा विभागामध्ये काही शासकीय व निमशासकीय अधिकारी देखील शिवभोजनालयाचे बिल काढण्यासाठी आर्थिक तडजोड करत असल्याची दपक्या आवाजात सध्या चर्चा चालू आहे नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी याकडे लक्ष देतील का

# विरोध करणाऱ्या तरुणाचे अपहरण करून संशयितांकडून अमानुष मारहाण



बीड / प्रतिनिधी

परळीमधल्या (जि. बीड) धार्मिक कार्यक्रमात गुंड प्रवृत्तीच्या टोळक्याने मुलींची छेड काढल्याचा गंभीर प्रकार घडला. या गैरवर्तनाला एका तरुणाने विरोध केला. त्यामुळे संतापलेल्या टोळक्याने या तरुणाचे अपहरण करून त्याला अमानुष मारहाण केली असून, या घटनेचा व्हिडिओ तयार केला. तो सोशल मीडियावर व्हायरल झाला असून संपूर्ण जिल्ह्यात संतापाचा उद्रेक झाला आहे.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरण ताजे आहे. त्यानंतरही बीड जिल्ह्यातल्या घटना थांबायला तयार नाहीत.मिळालेल्या माहितीनुसार, परळी तालुक्यातील जलालपूर गावात अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रम सुरू असताना काही युवकांनी महिलांशी गैरवर्तन करत छेडछाड केली. गावकऱ्यांनी त्यांना तत्काळ कार्यक्रमातून बाहेर काढले. परंतु, याचा राग मनात ठेवून आरोपींनी शिवराज हनुमान दिवटे (रा. परळी, जि. बीड) या तरुणाचे पेट्रोल पंपावरून अपहरण केले आणि त्याला लाठ्याकाठ्यांनी व बेल्टने अमानुषपणे मारहाण केली.

आरोपींनीच केला व्हिडिओ

या सर्व घटनेचा व्हिडिओ आरोपींनी स्वत: चित्रीत केला असून तो सोशल मीडियावर व्हायरल करत दहशतीचा प्रयत्न केला. मारहाणीत गंभीर जखमी झालेला



शिवराज जीवाची भीक मागत असतानाचा क्षण या व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसून येतो. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात या प्रकरणी समाधान मुंडे आणि इतर आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरीही आरोपी मोकाट फिरत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे.

शुक्रवारी सायंकाळी सुमारे ४ वाजता शिवराज हा सप्ताह कार्यक्रमावरून परतत असताना, परळी येथील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळून त्याचे अपहरण करण्यात आले. त्यानंतर टोकवाडी येथील रत्नेश्वर मंदिर परिसरात नेऊन त्याला लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण करण्यात आली.

आरोपी स्थानिक नेत्याशी संबंधित असल्याची चर्चा

या संपूर्ण घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, आरोपी युवकांचे स्थानिक राजकीय नेत्यांशी संबंध असल्याची जोरदार चर्चा आहे. त्यामुळेच पोलिस प्रशासन दबावाखाली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. नागरिकांनी या घटनेच्या सखोल चौकशीची आणि आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दमानिया काय म्हणाल्या?

अंजली दमानिया म्हणाल्या की, बीडचे परळी म्हणजे एक दहशतीचा आता अड्डा झालेला आहे. या विषयाला गंभीरतेने घ्यायला हवे. कारण कालची जी मारहाण झाली त्यातली जी सगळी मुले होती ती अतिशय छोटी आणि १८ वर्षांच्या आसपासची होती. त्यांनी केलेली मारहाण बघून ज्याला मारले त्याला ज्या पद्धतीने पाया पडायला लावले हे सर्व बघून असं वाटतंय की ही रिवेंज केस होती.

अंजली दमानिया म्हणाल्या की, वातावरण आता कुठेतरी भलत्या दिशेने जात आहे.

# गूढ / भय कथा; विस्कटलेली घडी

शिवम, जरा हे बघता का प्लिज? निहारिका एक मासिक पुढे करत म्हणाली. आपल्या बायकोने आपल्या हातात काय आणून दिलं याचा विचार करत शिवमने ते मासिकातलं तिने उघडून दिलेलं पान वाचायला घेतलं. सगळं वाचून झाल्यावर त्याने तिच्याकडे थोडं त्रासिक मुद्रेने पाहिलं. याचं काय आता? त्याने मासिक बाजूला ठेवलं. अहो. आपण त्याला मदत करूया ना? आपल्याला शोधता येईल याला. कारण आमच्या बँकेच्या दहाव्या वर्धापन दिना निमित्त हे मासिक काढलेले होतं. माझ्या बाबांनी बरेच शेअर्स त्या बँकेचे घेतले असल्यामुळे हे लिहिणारा कोण आहे हे आपल्याला सापडू शकेल. मला वाटतंय आपण त्याला मदत करावी. ती सोफ्यावर त्याच्या बाजूला बसत म्हणाली. अगं, पण नसत्या उचापती आपण का कराव्यात? आणि मी काय मदत करणार याला? शिवम हसत म्हणाला.

हे तुम्ही म्हणताय? द शिवम केदार! ज्यांचा पराक्रम मी स्वतः बघितलाय. आणि इतक्या संकटात असणाऱ्यांना तुम्ही मदत केलीय. प्लिज करा यात काहीतरी. निहारिका काकूळतीला येऊन म्हणाली. शिवमने थोडावेळ विचार केला. ठीक आहे. या माणसाला आपल्याकडे बोलावून घे. मी यातली सत्यता पडताळून मग ठरवेन. त्याच्या या वाक्यावर निहारिका खूप खुश झाली. तिने लगोलग बँकेत चौकशी करून बँकेच्या कॅशियर विजय प्रधान याची माहिती मिळवली. त्याला फोन करून दुसऱ्या दिवशी घरी येण्याचं निमंत्रण दिलं.

दुसऱ्या दिवशी निहारिका आणि शिवम दोघांनीही आपल्या बाकी कार्यक्रमाना सुट्टी दिली आणि सगळा वेळ त्या विजय प्रधान साठी राखून ठेवला. दुपारी बारा वाजता दरवाज्याची बेल वाजली. दार निहारिकाने उघडलं. दारात एक तिशी पस्तीशीचा माणूस उभा होता. नमस्कार. मी विजय प्रधान. तुम्ही मला बोलावलं होतं. काहीतरी तुम्हाला जे हवंय त्यासाठी आम्ही मदत करू असं म्हणाला होतात. पण मला जे हवंय – निहारिका त्याला हाताने थांबवत म्हणाली हो हो, आत तर या. माझे मिस्टर आहेत. तेच यात तुम्हाला मदत करू शकतात. आपण बसून बोलू शांतपणे. या. ती त्याला आत घेऊन आली. तो बिचकत आत आला. सोफ्यावर शिवम पाईप ओढत बसला होता. या, बसा. तुम्हीच विनय प्रधान ना? शिवम हसत म्हणाला. मी शिवम केदार. तसा एक व्हायोलीन टीचर आणि अल्केमिस्ट पण तुमच्या केस साठी... कळेल तुम्हालाही. बसा निवांत. निहारिका, दुपारची वेळ आहे. यांना सरबत वगैरे दे काहीतरी. शिवमच्या या सूचनेवर निहारिका आत गेली. सरबत घेऊन जेव्हा ती आली तेंव्हा तिला जाणवलं की विजय थोडा स्टेबल झाला आहे. मन रिलॅक्स होतं आणि माणूस मोकळ्या मनाने बोलू शकतो असा प्रभाव पाडणारं रसायन मिसळलेलं सरबत तिने त्याला दिलं. हां, प्रधान. सांगा तुमची हकीकत. कथा मी वाचलीय पण मला अजून सखोल पद्धतीने सांगा. अर्धवट मिटल्या डोळ्याने त्याच्याकडे पहात शिवम म्हणाला. विजय प्रधान बोलू लागला. त्याच्या सांगण्यात एक आर्तता होती. एक विलक्षण हकीकत समोर साकार होत होती.

खरं म्हणजे अशी अद्भुत गोष्ट कुणाबाबत घडत नाही जी माझ्याबरोबर घडली, विजय ने बोलायला सुरुवात केली, प्रत्येकाला व्हावी अशी वाटते ती. पण तिला मी स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेणं म्हणेन, कारण माझी त्यानंतर जी अवस्था आहे ती वैऱ्याचीही होऊ नये. प्रस्तावना भरपूर झाली, आता ऐका. थोडं थांबून त्याने बोलायला सुरुवात केली.

तसा मी मध्यम वर्गीय कुटुंबातला पण वडील गेल्यावर घरची जबाबदारी अंगावर पडली. शिक्षण पूर्ण केलं. पडेल ते काम करून, प्रसंगी लांडी लबाडी करून स्वतःचा व्यवसाय उभा केला, तो वाढवला. मार्केटमध्ये माझ्या कंपनीचा दबदबा होता. घरात लक्ष्मी पाणी भरत होती. सोन्यासारखी बायको, एक मुलगा आणि मुलगी असा सुखी संसार होता. सगळं छान चाललं होतं. पण वेळ काय सांगून येते? माझीही आली.

माझा एक मित्र खूप वर्षांपूर्वी आफ्रिकेला गेला होता. रंजन नाव त्याचं. आमची कोलेजपासूनची मैत्री. मधल्या काळात जरा संपर्क तुटला. एका बिझनेस पार्टीत आमची गाठ पडली. तोही इतक्या वर्षात चांगला मालदार माणूस झाला होता. हिऱ्यांचा व्यापार होता त्याचा. पूर्वी काही बाबतीत त्याचं माझं पटत नसायचं. कधीकधी तर्काला सोडून काहीकाही गोष्टी बोलायचा तो. शक्ती,सिद्धी, विश्वरचना, जगाचे वेगवेगळे आयाम वगैरे. पण आता सुधारला असावा असं वाटत होतं त्याच्या एकंदरीत बोलण्यावरून. मी त्याला खास डिनरसाठी बोलावलं. आज मात्र मला या गोष्टीचा पश्चाताप होतोय. एक महिन्यापूर्वी आमची ती भेट झाली आणि माझं आयुष्य बदललं ते कायमचं.

रंजन त्या रात्री सात वाजता घरी आला. अशाच गप्पा रंगल्या. जुने दिवस, आताचं आयुष्य असं बरंच बोलणं सुरू होतं. अचानक त्याने बोलण्याचा ट्रॅक बदलला. त्याने मला विचारलं, आपल्या आयुष्यातला एखादा प्रसंग बदलावा असं वाटतं का तुला ? म्हणजे एखादा वाईट किंवा सहन न होणारा प्रसंग जो नसता घडला तर आयुष्य काहीतरी वेगळं असतं, काय वाटतं तुला ? मी म्हटलं , हो असा अप्रिय प्रसंग आहे खरा. आज बाबा असते तर त्यांना हे यश पाहून आनंद झाला असता.पण काय उपयोग ? सोड

तो म्हणाला अरे हे शक्य आहे. करता येऊ शकतं मी हसायला लागलो, झालं का पुन्हा सुरू तुझं, अरे मित्रा, मला वाटलं इतके वर्षात सुधारला असशील. काय तू पण तो मात्र गंभीर होता.

त्याने आपल्या खिशातून एक छोटी पेटी काढली. त्या पेटीत एक छोटा मणी आणि एक घड्याळासारखं काहीतरी होतं. तो सांगू लागला, हा मणी आणि हे घड्याळ साधं नाहीये. या मण्याला घड्याळावर असणाऱ्या या खोबणीत बसवून घड्याळ चालू केलं की, स्थळ काळ आणि पदार्थ यावर परिणाम करणारी अदभूत शक्ती कार्यरत होते. आणि ज्या काळात, ज्या प्रसंगात आपल्याला बदल करायचाय त्या बदलाचा विचार केला की तो विचार साकार होतो.मला आफ्रिकेत असताना एका मांत्रिकाने दिलं होतं. त्याच्यासाठी एक खास हिरा मी आणला होता. तो हरवला होता. याच घड्याळाच्या मदतीने आम्ही तो हिरा हरवण्यापासून वाचवला. बोल! मी म्हणालो, काय बोलणार ? हे असले अँटिक पीस कोणीही विकतात. आणि त्या मांत्रिकाने हातचलाखीने हिऱ्याच्या बाबतीत फसवलं असेल तुला तो वैतागला होता, तुला एवढंच जर वाटत असेल तर करूया आपण प्रयोग. नावं ठेवायला काय जातंय तुझं ? हिम्मत आहे का ? आता मी पण जिद्दीला पेटलो. चल, मी तयार आहे. सांग काय करायचं ? त्याने घड्याळाच्या छोट्या खोबणीत मणी बसवला. बोल काय बदल करायचाय ? मी म्हणालो, मला बाबांची उणीव आजही भासते. त्यांची जाण्याची वेळ बदलायचीय. रंजन बघत राहिला, म्हणाला, नक्की हेच करायचंय. बघ याचे वेगवेगळे परिणाम होऊ शकतात. मी आता मागे हटणार नव्हतो, अरे बघू रे, आला मोठा परिणामवाला. तो फक्त हसला. त्याने माझं बोट मण्यावर ठेवलं. बाबा गेले ती तारीख सेट केली आणि म्हणाला, आता डोळे मिट आणि तो विचार जोरात उच्चार. मी तसं केलं मात्र ,स्फोट व्हावा तशी डोळ्यांसमोर रंगांची उधळण झाली. अर्ध्या मिनिटात सगळं नॉर्मल होतं. मी डोळे उघडले. सगळं जैसे थे. मी त्याला म्हणालो, बघ , काही बदल झाला का ?उगाच आपला बाष्कळपणा. माझ्या हातातलं घड्याळ मी सोफ्यावर टाकून दिलं. माझा अंदाज चुकला आणि ते जमिनीवर पडलं. त्याच्या काचेला तडा गेला. एक सोनेरी किरणशालाका त्यातून बाहेर पडल्यासारखी वाटली. रंजन ओरडला, काय करून ठेवलंस हे ? अरे तो एकमेव दुवा होता. आता काही झालं तरी काहीही करता येणार नाही. माझं नुकसान केलंस ते केलंस पण स्वतःचंही नुकसान केलंस. आता मात्र माझा पारा चढला, मित्र मित्र म्हणून तुझा हा खेळ मी चालू दिला तर वाटेल ते बोलायला लागलास. मूर्खासारख्या गोष्टी बोलू नकोस. रंजन ताडकन उठला. पडलेलं घड्याळ उचललं. म्हणाला, तुला या गोष्टी कधीच समजणार नाहीत. मी या गोष्टींच्या अभ्यासासाठी आयुष्य वेचलंय. प्रत्यय आल्याशिवाय तुला समजणार नाही कधी तो निघून गेला. मीही शांत झालो होतो. तो निघून गेल्यावर मी जेवण आटोपलं आणि माझ्या कामाला लागलो. रात्री उशिरापर्यंत काम चालू होतं. डोळे थकल्यासारखे वाटत होते म्हणून जरा डोळे मिटून मागे रेलून बसलो, आणि माझा डोळा लागला.

मला जाग आली, पण मी जागा झालोय का स्वप्नात आहे हे कळायला मार्ग नव्हता. मी एका वेगळ्याच खोलीत होतो. अंगावर वेगळेच कपडे होते.अहो उठलात तुम्ही ? आज उशिरापर्यंत झोपलात ? बरं वाटतंय ना ? प्रश्न ओळखीचे होते पण आवाज वेगळा होता. बँकेत जायला उशीर होईल आवरा लवकर आवाज देणारी व्यक्ती समोर आली. कोणीतरी वेगळीच बाई माझ्याशी माझ्या बायकोसारखं वागत होती. मला काही समजायला मार्ग नव्हता. मी काहीं न बोलता उठलो. बेडच्या बाजूला एक टेबल होतं. त्या टेबलावर माझा आणि त्या बाईचा फोटो होता ! अगदी नवरा बायकोचा असतो तसा! मला कळत नव्हतं ही बाई मला बँकेत जायला का सांगत होती आणि हे घर कोणाचं होतं ? आणि माझा हिच्यासोबत फोटो कसा ? मी उठलो.हॉलमध्ये आलो. इतक्यात आवाज आला, सुनबाई, अगं विजय उठला का ? माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. कारण तो आवाज माझ्या बाबांचा होता ! मी धावत आवाजाच्या दिशेने गेलो. मला बाबा दिसले. कोणालाही जे लाभत नाही ते भाग्य मला लाभलं होतं याचा आनंद झाला पण दुसऱ्या क्षणी त्याची जागा दुःखाने घेतली कारण बाबा व्हीलचेअर वर होते. अर्थात माझ्या वयाच्या हिशोबात त्यांचं वयही वाढलं होतं, पण व्हीलचेअर ? काही समजायला मार्ग नव्हता. विजय, अरे बघतोस काय असा ? तो तिथला पेपर दे, आणि बरी आहे ना तब्येत ? उशिरा उठलास म्हणून विचारलं. मी काही नाही अशा अर्थाने मान हलवली आणि त्यांना पेपर दिला. माझ्या (मला माहित नसलेल्या) बायकोने मला चहा दिला. मला जास्त बोलताही येत नव्हतं. कारण सगळं आकलनाच्या पलीकडे होतं. ऑफिसला सुट्टी घेतलीय असं बायकोला (तिचं नावही मला माहित नव्हतं) सांगितलं. आता थोडा विचार करायला अवधी मिळाला.

माझा बंगला होता पण याक्षणी मी एका वन बीएच के मध्ये होतो. वडील सोडून बाकी काहीच माझ्या ओळखीचं नव्हतं. आम्ही तिघेच रहात होतो. मुलं नसावीत कारण दोघांकडूनही तसा थोडाही उल्लेख झाला नव्हता. आता थोडं थोडं समजायला लागलं होतं काय झालं असावं. घर बघत असताना बेडरूमधल्या टेबलावर एक डायरी ठेवलेली पाहिल्याचं आठवत होतं. येस! डायरी!बाबांनंतर या परिस्थितीशी जोडणारा तो दुसरा दुवा ठरू शकतो. कारण डायरी लिहायची सवय मला लहानपणापासूनच होती. मी जाऊन ती डायरी घेतली. थोडे संदर्भ समजू लागले. आता मी घरभर शोधलं. एका जुन्या पेटीत मला बऱ्याच डायऱ्या मिळाल्या. त्या सगळ्या डायऱ्यांमधून माझीच पण मला माहित नसलेली हकिगत समोर आली ती अशी, 'ज्या दिवशी माझे वडील गेले होते (जुन्या समजुतीप्रमाणे) त्याच्याच महिन्याभराने त्याचा अपघात होऊन पाय निकामी झाले होते. नंतर काम करत करत मी शिक्षण पूर्ण केलं आणि बँकेत कॅशियर म्हणून लागलो. पुढे बाबांच्याच एका मित्राची एकुलती एक मुलगी, नंदिनी हिच्याशी माझं लग्न झालं. मोठ्या मेहनतीने मी हे वन बीएचकेचं घर घेतलं. आम्हाला मुलबाळ काही अजूनपर्यंत झालं नव्हतं' हस्ताक्षर माझं नसतं तर मी विश्वास ठेवला नसता की ही माझी डायरी आहे. कारण डायरीतला मी आणि खरा मी पूर्ण वेगळे होतो.

डायरीत मला माझे विचारही लिहायला आवडायचे. त्यासाठी मी खास जागा राखून ठेवायचो. तिथे मला जे लिहिलेलं दिसलं त्याने मला जास्त धक्का बसला. त्यात समांतर विश्व, मृत्यूनंतरचं जीवन वगैरे लिहिलं होतं. एक मिनिट! समांतर विश्व ? शक्यतांचं जग ? रंजनही असंच काहीसं बोलायचा. मी स्वतःशी पुटपुटलो. रंजन आठवल्यावर मला आठवली कालची रात्र . तो प्रयोग. आणि सगळं चित्र स्पष्ट झालं. एके ठिकाणी मी माझं स्वप्न म्हणून जे काही त्या डायरीत लिहिलं होतं, ते वाचून थक्क व्हायची वेळ आली. कारण तसाच बंगला, तशा गाड्या, सगळं काही तेच तसंच कालपर्यंत माझ्याकडे होतं. आता खेळ लक्षात आला. बाबांचं जाणं ही एक घटना बदलण्याच्या नादात मी माझा वर्तमान आणि भविष्य बदलून टाकलं होतं. आता रंजनही भेटण्याची शक्यता नव्हती. कारण वडील नसताना पैशासाठी ज्या अनेक उचापत्या मी केल्या होत्या, त्यात मला रंजन भेटला होता आणि आमची मैत्री झाली होती. एका घटनेला बदलून मी पुढची शक्यतांची मालिकाच बदलून टाकली होती. स्वतःला सिद्ध करण्याचा नादात मी खूप मोठी चूक करून बसलो होतो. रंजनने तेंव्हा सावध केलं होतं, पण मी एका शब्दाने ऐकलं नाही. बेफिकीरपणे ते घड्याळ तोडून स्वतःच्या सुटकेचा मार्गही गमावला होता. त्याचे शेवटचे शब्द आता मला आठवू लागले. प्रत्यय आल्याशिवाय तुला समजणार नाही मी डायरी बाजूला ठेवली आणि डोळे बंद करून पडून राहिलो. मिटल्या डोळ्यासमोर ते तडा गेलेलं घडयाळ दिसत होतं, आणि कानात रंजनचे शेवटचे शब्द घुमत होते.

आता महिना होऊन गेला या सगळ्याला. नंदिनीबरोबर जुनाच संसार नव्याने सुरू केलाय. आजही हाताखालून खूप नोटा जातात पण त्यातली कुठलीच नोट माझी नसते, चार चाकी गाड्यांऐवजी रेल्वे आणि रिक्षा हीच माझी वाहनं झालीयत. सत्य स्वीकारल्यावर मग परिस्थितीशी जुळवून घेता येतं माणसाला याचाही प्रत्यय आलाय. बाबांकडे पाहिल्यावर मात्र मन खिन्न होतं. त्यांच्या या अवस्थेला कुठेतरी मी जबाबदार असल्याची टोचणी मनाला लागून राहते. कधी कधी स्वप्नात माझा बंगला, बायको, मुलं दिसतात आणि मन व्याकुळ होतं. वाटतं, कुणीतरी यावं पुन्हा ' बदल ' घडवण्यासाठी. एक दीर्घ उसासा टाकून तो बोलू लागला.

ही व्यथा काळजात घेऊन आजही फिरतोय. निहारिका मॅडमचा फोन आला आणि कुठेतरी लहानशी आशा जागी झाली म्हणूनच मी तुमच्यापाशी व्यक्त झालो. कराल का माझी मदत? विजय आशेने समोरच्या व्यक्तीकडे बघत होता.अर्धवट मिटल्या डोळ्याने समोर दुःखी चेहऱ्याने त्याच्याकडे अपेक्षेने बघत असलेल्या विजयकडे शिवम करुणेने बघत होता. अत्यंत्यिक बुद्धीवादी वर्तनाला नियतीने केलेलं शासन काय असतं याचं मूर्तिमंत उदाहरण त्याच्यासमोर होतं. हं, तुमची हकीकत मोठी विलक्षण आहे. मल्टी युनिव्हर्स ही संज्ञा आता आता कुठेतरी विज्ञान गृहीत धरू लागलं आहे. आणि तुम्ही त्याचं जिवंत उदाहरण आहात. मी करेन तुमची मदत. पण तुम्हाला याचे चार्जेस द्यावे लागतील. का तेही सांगतो. हा खेळ नाहीये की इकडून तिकडे जाणं आणि तिकडून इकडे येणं. तुमच्याकडून चुकीने जाणं झालं असलं तरीही. तुम्ही मला शब्द द्या की याचा योग्य मोबदला तुम्ही द्याल तर आणि तरच मी हे करेन. शेवटच्या वाक्य उच्चारताना त्याच्या आवाजाला धार आली होती.

विजय ने होकारार्थी मान हलवली. तसं शिवमने आपल्या कॉन्टॅक्टमध्ये असणाऱ्या लोकांमध्ये चौकशी करून रंजन ची माहिती मिळवली. योगायोगाने ती माहिती विजयने सांगितलं होतं तशीच होती. रंजनचा कॉन्टॅक्ट नंबर सुद्धा मिळाला. शिवमने त्याची वेळ घेतली. नेमकी संध्याकाळची वेळ मिळाली. शिवमने रंजनला आपल्या घरी बोलावलं.या सगळ्यामुळे विजयला खूप आनंद होत होता. कारण त्यालाही कळलं होतं की त्याच्या अनाठायी हट्टाचा परिणाम कुठपर्यत गेला होता. त्यासाठी त्याने शिवमची पुन्हा पुन्हा क्षमा याचना केली होती

संध्याकाळी सहा वाजता रंजन शिवमच्या घरी आला. समोर विजयला पाहून त्याला आश्चर्याचा धक्का बसला अरे! तू इकडे कसा? हॉस्पिटल मध्ये होतास तू, तेही कोमा मध्ये. मग इथे? थांब मी वहिनींना कळवतो शिवमने त्याला हाताच्या इशाऱ्याने शांत केलं. रंजन. हे बघ. तू ज्याला बघतोयस तो विजयच आहे. पण समांतर विश्वातला विजय. रंजन ऐकत राहिला. तुम्ही दोघांनी जो काही विचित्र प्रकार केलाय त्याचा हा परिणाम आहे. ते यंत्र वापरून निसर्गाच्या फार मोठ्या योजनेची क्रूर थट्टा केली गेलीय. दोन समांतर मितींमधल्या अस्तित्वाना एक केलं गेलंय. ते यंत्र एका सैतानी शक्तीची निर्मिती आहे. रंजन मला नीट सांग ती वस्तू तुला कोणी दिली होती? शिवम चा आवाज कठोर झाला होता.त्या कठोर वाणीपुढे रंजन थरथर कापू लागला आणि तो बोलायला लागला.

रंजन शहा. नावाला हिऱ्याचा व्यापारी पण मूळ व्यवसाय तस्करीचा. या व्यवसायाचा परिणाम म्हणून त्याच्या ओळखी जितक्या उच्चभ्रू लोकांशी होत्या तश्याच कपटी आणि नीच लोकांशीही होता. अशाच एका व्यवहारात त्याची ओळख पुम्बा मोये शी झाली. हा एक आफ्रिकन मांत्रिक होता. पुम्बा साठी रंजन ने अनेक वस्तूंची तस्करी केली होती. असाच एक हिरा जो त्यांच्या आराध्य देवतेच्या पूजेसाठी हवा होता, त्याची तस्करी करताना मधल्यामध्ये तो हिरा गहाळ झाला होता. अर्थात रंजनचे आणि त्याचे संबंध जुने असल्यामुळे त्याने त्याचा जीव घेतला नाही. मात्र एक वस्तू दिली आणि त्या वस्तूद्वारे एका जीवाचा बळी आणायला सांगितला. ती वस्तू म्हणजे ते यंत्र होतं. रंजनला त्या दिवसानंतर चोवीस तासाचा अवधी दिला गेला होता.

काय करावं असा विचार करत असतानाच त्याला त्याच्या एका मित्राचा, विजय प्रधानचा मेसेज आला. त्याला जेवणाचं आमंत्रण होतं. त्याने ठरवलं की हे करायचं आणि आज करायचं. त्याला कळत होतं की हे चुकीचं आहे पण तसं केलं नाही तर चोवीस तासांनी त्याचा जीव जाणार होता. ठरल्याप्रमाणे त्याने विजयसमोर एक नाट्यमय कथा रचली आणि त्या यंत्रा चा वापर करून घेतला. मात्र ते यंत्र अपघाताने फुटलं. तात्पुरतं काहीतरी उत्तर देऊन त्याने तिथून काढता पाय घेतला. मात्र त्याला धाकधूक होतीच.

तो दिवस कसबसा संपला.दुसऱ्या दिवशी ठरल्या वेळेला पुम्बा चा त्याला फोन आला. झालेली घटना कळल्यावर पुम्बा पिसाळला आणि पुढच्या अर्ध्या तासात त्याला ठार केलं जाईल असं सांगून त्याने फोन ठेवलाही. त्यानंतरचं प्रत्येक मिनिट एक एक युगासारखं त्याला वाटत होतं. पाऊण तासाने त्याला पुम्बा चा फोन आला. नालायका! काय केलंयस तू हे? माझ्या शक्ती निष्प्रभ झाल्यात. तो आत्मा आमच्या दैवतापर्यंत पोहचला तर नाहीच पण आमचं दैवत सुद्धा एका मधल्या पोकळीत अडकलं. लक्षात ठेव. एक महिन्याने आम्ही आमच्या दैवताला पुन्हा जागृत करूच. तेव्हा तुझा बळी देऊ आम्ही.. रंजन ने काकूळतीला येऊन विनंती केली. यावर काहीच उपाय नाही का? त्यावर पुम्बा म्हणाला. विचारलं आम्ही आमच्या प्रमुखाला तेव्हा ते म्हणाले की तो आत्मा दुसऱ्या जगात गेलेला आहे. दैवत सहज जागृत करावं असं वाटत असेल तर त्याचा बळी त्याला द्यावा लागेल. आणणार असशील तर आणून दाखव. मग बघू. नाहीतर तुझं मरण नक्की आहे लक्षात ठेव. तो काही बोलणार होता पण समोरून फोन कट झाला होता.

हताशपणे तो कोचावर बसला. इतक्यात त्याला कॉल आला. कॉल त्याच्या मित्राचाच होता मात्र त्याच्याकडून विजय कोमात असल्याचं समजलं. त्या दिवसापासून तो विजय शुद्धीवर येण्याची वाट बघत होता.

महिन्याच्या शेवटचा दिवस असतानाच त्याला शिवम केदार नावाच्या व्यक्तीचा फोन आला आणि त्याच्या कोणालाही माहित नसलेल्या समस्येवर त्याच्याकडे उत्तर आहे असं समजल्यावर त्याने इतर कामं तडकाफडकी रद्द केली. जेव्हा तो तिथे पोहचला तेव्हा त्याला विजय दिसला. अनाकलनीय आणि अतर्क वाटणरी गोष्ट! पण तो आता वाचू शकणारं होता. त्याने विचार करायला सुरुवातच केली होती इतक्यात समोर असणाऱ्या शिवमने आपल्या कठोर वाणीने त्याचा उरला सुरला धीर संपवला होता. आता काय होणार याच प्रतीक्षेत रंजन शिवम कडे पहात होता.

मानवी स्वार्थाची परिसिमा बघून शिवमचा संताप झाला. विजय रंजनच्या अंगावर धावून गेला. नराधमा! काय केलंस हे? किती घाणेरडा प्रकार केलायस तू? देव, निसर्ग कशाचीही फिकीर नाही तुला? माझा जीव जाणार होता जीव. माझं नशीब थोर म्हणून आणि म्हणूनच मी कुठे फेकला गेलो. तो दुवा चिटकून राहिला म्हणून आता यांच्यासमोर येऊ शकलो. काय करू मी आता शिवम सर? असं म्हणत विजय ओक्सबोक्सी रडू लागला. शिवमने त्याला शांत केलं. रंजनला धारेवर धरून त्याने त्या यंत्राचं चित्र काढून घेतलं. त्यावर काही क्षण ध्यान करून ते यंत्र आपल्या स्मृतीत पक्क केलं. त्यानंतर त्या दोघांना घेऊन शिवम आपल्या दिवाणखण्यातल्या पुस्तकांच्या शेल्फ मागच्या खास खोलीत आला. ते तिघे आत जाताच खोलीचं दार बंद झालं. रंजन ने पळायचा प्रयत्न केला मात्र शिवमच्या एका दमापुढे त्याचं काहीच चाललं नाही..

आत आल्यावर तिथल्या कपाटातून शिवमने एक मेणाची बाहुली काढली. तिथेच असणारं एक व्हायोलीन घेऊन त्याने काही स्वर वाजवायला सुरुवात केली.जसं जसे स्वर आर्त होत गेले समोर दिसणाऱ्या विजयच्या शरीरातून एक धुसर आकार बाहेर आला आणि तो मेणाच्या बाहुलीत गेला. शिवमने समोर असणाऱ्या विजयला हाताने जा अशी खूण केली. त्याबरोबर समोर दिसणारा विजय हळूहळू धुसर होत अदृश्य झाला. रंजन या क्रियेकडे बघत राहिला. हे काय केलं तुम्ही?शिवमने फक्त तोंडावर बोट ठेऊन शांत रहाण्याची खूण केली. मघाशी चित्र काढलेलं यंत्र स्मृतीसमोर आणलं. त्याचं ते आकार परिवर्तन करणारं रसायन समोर समोर ठेऊन त्यात एक लाकडी ठोकळा टाकला आणि पायस राग वाजवायला सुरुवात केली. बघता बघता त्या रसायनाच्या द्रावाच्या पृष्ठभागावर त्या यंत्राची आकृती दिसू लागली.

घे हे यंत्र हातात आणि दाब याची कळ. शिवमने करड्या स्वरात आज्ञा दिली. अहो पण हे... नको हो.. मला भीती वाटते. रंजन रडकुंडीला येत म्हणाला. घाण करताना लाज नाही वाटली आणि निस्तरताना वाटतेय? गपचूप कर. काही होत नाही. मी आहे. रंजना ने तो सांगत होता तसं केलं. त्या घड्याळ वजा यंत्रातून तसाच प्रकाश बाहेर पडला. मात्र यावेळी एक काळा आकारही बाहेर आला. आणि त्याने तात्काळ रंजन भोवती वेटोळं घातलं. रंजन तडफडू लागला. तसं शिवमने युद्धाचा पवित्रा घेऊन गर्जना केली. तुझा बळी माझ्याकडे आहे. आधी तो ताब्यात घे. त्याचं वाक्य ऐकून तो आकार त्याच्यावर झेप घेऊन आला. आता त्या आकाराला लालसर ज्वालेची किनार आली होती. घणाघाती आघात सुरु झाले. खोली हादरत होती. अचानक थंड पडत होती. गरम होत होती. शिवमने आपल्या पराक्रमाची शर्थ केली. त्या दैवताची शक्ती अचाट होती.शेवटी गुरूंनी शिकवलेल्या त्रिशूल अस्त्राचा त्याने वापर केला. त्या आघातासमोर मात्र ते चिरडलं गेलं. शिवमने तात्काळ त्याच्या वळवळ करणाऱ्या शेपटीचा एक भाग काढून बाटलीत बंद केला. तसं ते एका आज्ञाधारक सेवकासारखं उभं राहिलं. काय? सोडू का अंगावर? शिवम हसत हसत म्हणाला. रंजन च्या तोंडून आवाज फुटत नव्हता. लाव. पुम्बा ला फोन लाव आणि फोन स्पीकर वर टाक. शिवम ने आज्ञा केली. रंजन ने गुपचूप तसं केलं. काय काम आहे? उद्या मरणार आहेस ना? मरणाऱ्या माणसांशी मी बोलत नाही. पुम्बा गर्विष्ठ आवाजात म्हणाला. मारणाऱ्याशी बोलण्या बाबत तुझं काय मतं आहे पुम्बा? शिवमने अस्खलित आफ्रिकन भाषेत सवाल केला. ते ऐकून समोर शांतता पसरली. कोण आहेस तू? पुम्बा घाबरला होता का? मी ओडामा ( मालक ) आहे समजलास? जुईल चा नवा ओडामा. काही क्षण थांबून पलीकडून वेगळा आवाज आला. मी इबदुका ( त्या पंथाचे मुख्य ) बोलतोय हे बघा. तुम्ही जे कोणी असाल ते. आम्ही आमची हार मान्य करतो. आमची चूक झाली.आमची गोष्ट आम्हाला परत द्या. त्याबद्दल्यात जे सांगाल ते करू. शिवम हसला. तुमची गोष्ट तुम्हाला परत मिळेल पण ती आयुष्यभर माझी गुलाम असेल हे लक्षात असू द्या त्याला जो जिंकतो त्याचा तो दास होतो हा तुमचा नियम आहे. त्यामुळे आता दोन नावं सांगतोय, रंजन शहा आणि विजय प्रधान,यांच्या वाट्याला बिलकुल जायचं नाही आणि माझ्या तर नाहीच नाही. काय समजलात? शिवमच्या कणखर आवाजाला पलीकडून नम्र आवाजात उत्तर आलं. हो. आम्हाला मान्य आहे सगळं. फोन रंजनला द्या. रंजन पुढे सरकला. मी बोलतोय. तो चाचरत म्हणाला. रंजन. तुझे आणि पुम्बा चे जे काही संबंध असतील ते आजपासून संपले. तू मुक्त आहेस. तू ज्या देव माणसासमोर आहेस त्याचा कधीही अपमान करू नकोस. इतकं बोलुन फोन कट झाला.

त्यानंतर शिवमने ते यंत्र परत त्या द्रावात टाकलं.तसं तो काळा आकार अदृश्य झाला. हे पार पडल्यावर त्याने ती मेणाची बाहुली समोर ठेऊन तेच स्वर पुन्हा वाजवले. तसं त्या बाहुलीतून तो आधी आत गेलेला आकार बाहेर पडला आणि तो हवेत विरून गेला. दोन क्षण शिवमला गरगरल्यासारखं झालं. आता सगळं ठीक झालं होतं. गोष्टी जिथल्या तिथं गेल्या होत्या. हं, चला आता बाहेर. असं म्हणत त्याने रंजन ला बाहेर जायची खूण केली. त्याला धड चालता येत नव्हतं. शिवमने त्याला आधार देऊन बाहेर आणलं. आणि सोफ्यावर बसवलं.

आता कर विजयच्या बायकोला फोन. शिवम त्याच्यासमोर ब्रँडीचा ग्लास पुढे करत म्हणाला. ते पोटात गेल्यावर रंजनला हुशारी वाटू लागली. लगेचच त्याने विजयच्या बायकोला कॉल करून परिस्थिती विचारली. फोन ठेवता ठेवता त्याच्या डोळ्यात आनंदाश्रू आले होते. त्याने शिवमचे पाय धरले. शिवमने त्याला हाताला धरून उठवलं. पाया बिया नको पडू.. त्या काय म्हणाल्या ते सांग. शिवम म्हणाला. शुद्धीवर आलाय विजय. उद्या सकाळी कदाचित बोलणं करून दिलं जाईल. शिवमने हसत हसत वरती पाहिलं आणि मग त्याने आवाजात जरब आणत म्हटलं. यापुढे सगळे दोन नंबर चे धंदे बंद म्हणजे बंद! कळल का?गुपचूप हिऱ्याचा व्यापार करायचा. कष्ट आणि ज्ञानाच्या बळावर आपली भाकरी कमवून खायची. जा आता घरी. उद्या सकाळपर्यत सगळं तुझ्या डोक्यातून निघून गेलेलं असेल. शिवमचा निरोप घेऊन रंजन निघून गेला. शिवमला एक अनामिक समाधान जाणवत होतं. त्याने निहारिकाला कॉल केला आणि घरी बोलवून घेतलं. रात्री भरपेट जेऊन तो निद्रा देवीच्या अधीन झाला.

सकाळी जेव्हा त्याला जाग आली तेव्हा त्याला खूप प्रसन्न वाटत होतं. फ्रेश होऊन शिवम दिवाणखान्यात आला. टेबलवर ठेवलेला पेपर हातात घेतला. तिथेच ते बँकेचं मासिक पडलं होतं. ते त्याने उचलून चाळून पाहिलं. काल वाचलेली गोष्ट त्यातून नाहीशी झाली होती. शिवमच्या चेहऱ्यावर समाधान होतं. इतक्यात त्याच्या फोनवर बँकेचा मेसेज आला.एक पाच आकडी रक्कम खात्यावर जमा जमा झाली होती पाठोपाठ एका सेव्ह नसलेल्या नंबर वरून मेसेज आला. त्यात चारच ओळी होत्या

' मदतीबद्दल शतशः आभार. हा फक्त तात्पुरता मोबदला आहे. ही घटना माझ्या लक्षात राहो वा न राहो, कधीही मदत लागल्यास हक्काने सांगा.

आपला

विजय प्रधान

शिवम खळखळून हसला. त्याला खूप आनंद झाला होता, कारण सगळ्या गोष्टी त्यांच्या त्यांच्या जागी जाऊन बसल्या होत्या. विस्कटलेली घडी नीट होऊन काळाच पट पुन्हा एकदा नीट झाल होता आणि कालचक्र त्याच्या पूर्वगतीत फिरू लागलं होतं...

**–अभिषेक अरविंद दळवी,**

सुनील इनामदार, संग्रहक, ९८२३०३४४३४.

# गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक :प्रा.जगदीश गवळी

कळंब(प्रतिनिधी)

गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोघेही मानवतेच्या उद्धारासाठी कार्यरत असलेले महान विचारवंत होते. बुद्धांचे करुणा, अहिंसा व मध्यममार्गाचे तत्त्वज्ञान आणि बाबासाहेबांचे समता, बंधुता, शिक्षण व सामाजिक न्यायाचे विचार हे आजच्या समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. या दोन महामानवांचे विचार केवळ धार्मिक किंवा सामाजिक मर्यादांपुरते न राहता, ते एक न्यायपूर्ण आणि समतामूल्य समाजरचनेसाठी दिशादर्शक ठरतात असे मत प्रा जगदीश गवळी यांनी व्यक्त केले.

कळंब तालुक्यातील भोसा येथे समतेचे युवा पर्व अंतर्गत भिम जयंती व बुद्ध पौर्णिमेनिमित्त आयोजित गौतम बुद्ध व बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान समजून घेताना या विषयावर ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच सौ मंगलाताई विलास तौर या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून रमेश देशमुख, डॉ.संदीप तांबारे,मारुती देशमुख, कुंदन कांबळे, भगवान ओव्हाळ, विलास तौर,ड खूने,प्रा. डॉ.समाधान चंदनशिवे, बबलू शेख ,इरफान शेख,हसन मुलानी , श्रीमान , रोहित ताकपिरे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा . गवळी यांनी मूलभूत हक्क आणि कर्तव्य, विविध कलमानुसार घटनेमध्ये केलेल्या आरक्षणाच्या, शिक्षणाचा अधिकार यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की शिक्षण हा परिवर्तनाचा मूलाधार असून, बाबासाहेबांनी दिलेला शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मंत्र आजही तितकाच प्रभावी आहे. तथागत गौतम बुद्ध,शिवराय ,फुले शाहू, आंबेडकरांचा खरा विचार हा



शोषणमुक्तीचा होता हे समजून घेतलं पाहिजे असेही ते म्हणालेड्ड यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते वक्तृत्व, निबंध ,सामान्य ज्ञान स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका सौ प्रतिभा चंदनशिवे यांनी केले तर प्रास्ताविक व आभार प्रा . डॉ.समाधान चंदनशिवे यांनी मानले.

# चौसाळा येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी

चौसाळा /प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची सार्वजनिक जयंती मोठया उत्साहात व विविध समाजउपयोगी कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली सकाळी १० वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक भव्य अभिवादन सभा आयोजित केली होती यावेळी सामाजिक कार्यकर्ते विवेक(बाबा)कुचेकर यांच्या शुभहस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करण्यात आले यावेळी असंख्य मावळे मोठया सख्यंने उपस्थीत होते. सकाळी ११ वाजता चौसाळा शहरातुन भव्य मोटार सायकल रेली काढण्यात आली ही रॅली चौसाळा बायपास येथिल धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकात देखील अभिवादन करण्यात आले यावेळी कृषी उत्तपन्न बाजार समिती बीड चे संचालक दिपक(भाऊ)काळे, सुधाकर गुंजाळ, सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर, सुरज सोनवणे, धर्मवीर संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे




संस्थापक प्रदीप जोगदंड, जयंती अध्यक्ष समर्थ शिंदे, उपाध्यक्ष बबलू शिंदे, सचिव आदीत्य हावळे, कोषाध्यक्ष आमोल कांबळे ईत्यादी मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तर ११-३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी विविध जाती धर्मातील ५१ रक्तदात्यानी रक्तदान केले तर संध्याकाळी ०५ वाजता हनुमान मंदीर चौसाळा येथुन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकत प्रमुख आकर्षण आहील्यानगर जिल्हयातील कर्जत येथिल स्वरसंगम बॅन्जो व धाराशिव जिल्हयातील वाशी तालुक्यातील तांदळवाडी येथील भव्य रथ हे प्रमुख आकर्षण होते तर या मिरवणुकी दरम्यान चौसाळा शहरातील प्रत्येक महापुरुषांच्या चौकाला पुष्पहार अर्पण करण्यात आले या मिरवणुकीत प्रत्येक जाती धर्मातील मोठया सख्येने सामील झाले होते हा जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी संदेश खिवसरा, अंगद शिंदे, विजयराजे शिंदे, अतुल भैय्या शिंदे, मधुकर तोडकर, राजेश (अप्पा)नाईकवाडे, तुकाराम जोगदंड, नानासाहेब शिंदे,सुधाकर गुंजाळ,सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे संस्थापक प्रदीप (भाऊ)जोगदंड, यांच्या मार्गदर्शनाखाली हा जयंती सोहळा मोठया उत्साहात पार पडला यावेळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष समर्थ शिंदे, उपाध्यक्ष बबलू शिंदे, सचिव आदित्य हावळे, कोषाध्यक्ष आमोल कांबळे यांच्यासह

स्वप्निल हुंबे,तुषार नाईकवाडे, गणेश औताडे, रोहित जोगदंड, शैलेश जोगदंड, सुरज जोगदंड, सचिन नाईकवाडे,बंटी शिंदे, पंकज शिंदे,उमेश जोगदंड, अमर नाईकवाडे,सागर शिंदे,विकास शिंदे,विठ्ठल कळासे विकास नाईकवाडे,प्रसाद जालन, जगदीश हुंबे, सुरेश साळुंखे, सचिन इटकर,चंदन राहीज, युवराज जोगदंड, अक्षय कळसे, ज्ञानेश्वर जोगदंड,कृष्णा जोगदंड, श्रीजीत गुंठाळ,प्रताप शिंदे, सुरज हुंबे, रामु जोगदंड, कोंडीराम जोगदंड, मोहन शिंदे, नितीन शिंदे ,समाधान नाईकवाडे यांच्यासह असंख्य शिवप्रेमी मोठया संख्येने उपस्थीत होते.

# नांदेड जिल्ह्यातील वनपरिक्षेत्र वन आणि वन्य पशु वैभव धोक्यात ?


## वृक्षतोडी मुळे जिल्हा वाळवंट होण्याच्या मार्गावर ?वनधिकारी वरकमाई च्या नादात

नांदेड : जिल्यातील किनवट तालुका हा वन वैभव व वन्य पशुचं वैभव असलेला तालुका म्हणून हा महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे परंतु आज संबंधित वनपरिक्षेत्र कार्यालयातील ढिसाळ व बेजबाबदार अधिकारी, कर्मचारी यांच्या चुकीच्या कार्यप्रणाली वृत्तीमुळे आज येथील वन वैभव धोक्यात आल्याचे दिसते.नावलौकिक मिळवलेले इस्लापूर जवळील हरिण पठार सुविधेअभावी वसाड होताना दिसते तर तस्करामार्फत होत असलेली जिल्यातील वृक्षतोड परिणामी जंगलाचे वाळवंट होण्यास आता विलंब लागणार नाही अशी खंत वनप्रेमी कडून ऐकू येत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मौल्यवान सागी वृक्ष व वनौषधी गैरी वृक्षांचे रक्षण व्हावे आणि वन्यपशूची दिवसेंदिवस वाढ व्हावी आणि त्यांचे रक्षण व्हावे हा हेतू उराशी बाळगत यासाठी संबंधित शासन करोडो रुपये खर्च करीत आहे.परंतु आज रक्षकच भक्षक होत कुंपणच शेत खात असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

संबंधित क्षेत्रातील रक्षक म्हणून शासनाने ठेवलेले वन अधिकारी,कर्मचारी यांना याचे तीळ मात्र गांभीर्य नसून शासनाचे अतिदक्षता संवेदनशीलता म्हणून त्यांना मुख्यालयीच राहण्याचे सक्त आदेश असताना येथील अनेक जबाबदार अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी न राहता नांदेड या जिल्ह्याच्या ठिकाणाहून ये जा करतात, वरिष्ठांनी येथील सीसीटीव्ही फुटेज तपासले तर हा सर्व गंभीर प्रकार समोर येणार असल्याची खात्री अनेक पशुप्रेमींनी आमच्या सूत्राकडे बोलून दाखवली आहे.

जंगल रक्षणासाठी व वन्य पशुसंवर्धनासाठी शासन करोडो चा निधी देतो.त्याची खरंच



अमलबजावणी यांनी केली का ? सदर बाबीची ज्या काळ्या कमाईत हात बरबटले नसतील त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने चौकशी करावी. अशी मागणी आता समोर येऊ लागली आहे.

केवळ आणि केवळ काळा मलिदा लाटण्याच्या हेतूने निधी मागवून त्याची कशी विल्हेवाट यांनी लावली? कुठे पानवटे बांधली? किती बांधली? त्यात पाणी असते का ? किती रोपवाटिका यांनी जिवंत ठेवल्या? किती जंगल वनवा लागून राख झाला ? पट्ट्याच्या नावाखाली गैरी व सागी वृक्षांची किती अवैद्य तूट झाली ? आणि येथील अधिकाऱ्यांनी किती अवैध्य काळी माया या भ्रष्ट मार्गाने जमवली ? किती वनपाल एकाच ठिकाणी किती वर्ष केवळ मलिदा लाटण्याच्या हेतूने येथेच ठाण मांडून आहेत ? याचा उलगडा वृक्ष व वन्य पशु वर प्रेम असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करावा अशी मागणी आता तालुक्यातील जागृत नागरिकाकडून जोर धरू लागली आहे.

# विनयभंगाच्या कथित आरोपातून निर्दोष मुक्तता – ॲड.सायली सुतार.



बीड (प्रतिनिधी)

घरात घुसून महिलेचा विनयभंग करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मुख्य दंडाधिकारी बीड यांनी हनुमान सपकाळ यांची पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली आरोपीच्या वतीने ॲड. सायली सुतार यांनी काम पहिले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की कर्झणी ता.जि. बीड येथील हनुमान सपकाळ यांच्या विरुद्ध ग्रामीण पोलिस ठाण्यात भादवीचे कलम ३५४.४५२ व ५०६ अन्वये दि. २०/०१/२०२१ रोजी गुन्ह्याची नोंद होऊन दोषारोप मा.न्यायालयात दाखल झाले होते. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले परंतू कथीत घटना घडल्या बाबत सबळ पुरावा नसल्याचा ॲड सायली सुतार यांचा युक्तिवाद ग्राह्य धरण्यात येऊन हनुमान सपकाळ यांची मुख्य न्यायदंडाधिकारी बीड यांनी दि. १६/०५/२०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली.

या प्रकरणी आरोपीच्या वतीने ॲड सायली सुनील सुतार यांनी काम पाहिले तर ॲड किशोर टेकवाणी ॲड अशोक वाघमारे यांनी सहकार्य केले.

# नवी मुंबईत नागरिक पाणी समस्येने त्रस्त...अधिकारी वर्ग पुनर्विकास प्रकल्प अनावश्यक विकास कामे मंजुरी देण्यात व्यस्त

नवी मुंबई – रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया – राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाऊ निकाळजे यांच्या पक्षातील नवी मुंबई शहराचे संपर्कप्रमुख जनतेचे समस्या मांडणारे जनतेच्या प्रश्नासाठी लढणारे बहुजन नेते प्रतीक यादव यांनी नवी मुंबईत वारंवार उद्भवणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येवर आवाज उठवला आहे. एकेकाळी सुनियोजित शहरी व्यवस्थेसाठी ओळखले जाणारे नवी मुंबई पालिका क्षेत्र सध्या गंभीर पाणीटंचाईच्या समस्येत सापडले आहे. गेल्या तीन महिन्यांपासून येथील रहिवासी पिण्याच्या पाण्याच्या टंचाईमुळे त्रस्त झाले आहेत. पालिका क्षेत्रात पाइपलाइन दुरुस्ती आणि पाणीपुरवठा व्यवस्थेतील अपयशामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होत आहे.

नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त आणि अधिकारी पुनर्विकास प्रकल्पात गुंतलेले असताना पाणीटंचाईकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. आयुक्तांच्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी एसटीपी (सांडपाणी प्रक्रिया) पाण्याचा वापर करण्याचे आदेश असतानाही, अनेक ठिकाणी विकासक सर्रासपणे पिण्याच्या पाण्याचा वापर करत असल्याचे दिसत आहे. यामुळे आधीच कमी झालेला पाण्याचा साठा आणखी कमी होऊन नागरिकांच्या समस्या वाढत आहेत.

नवी मुंबई, जरी सुनियोजित शहर असले तरी वाढते नवीन इमारत प्रकल्प, पुनर्विकासाचे काम आणि वाढीव मजल्यांचे बांधकाम यामुळे येथील नागरी सुविधांवर प्रचंड ताण पडत आहे. पाणी, वीज, रस्ते, मलनिस्सारण व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधांवर ताण येत असून शहरातील दैनंदिन जनजीवन विस्कळीत होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



अधिकारी तात्पुरत्या कालावधीसाठी येऊन विकासकामे मंजूर करतात, पण त्याचा शहराच्या नागरी व्यवस्थेवर होणारा परिणाम कुणी विचारतो का? पुनर्विकास प्रकल्पांना परवानगी देताना पाणी, वीज आणि वाहतुकीच्या सोयीसाठी स्वतंत्र व्यवस्था न करता फक्त इमारती बांधण्यावरच लक्ष दिले जात आहे. आज नवी मुंबईकरांना पाणी टंचाईचे होणारी गंभीर समस्या लक्षात घेता पालिका आयुक्तांना अगोदरच पत्रव्यवहार करून नवीन इमारत आणि इमारत पुनर्विकास प्रकल्प याला संतोष सुतार यांनी विरोध केला होता अन्यथा यातून भविष्यात मोठ्या नागरी समस्यांचा सामना करावा लागू शकतो, असा सवाल प्रतीक यादव रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया – नवी मुंबई संपर्कप्रमुख यांनी केला आहे.

शाश्वत उपाययोजना गरजेच्या

नवी मुंबईतील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. नव्या इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पांवर कठोर नियंत्रण, पाण्याचा योग्य वापर आणि जलसंधारणासाठी प्रभावी धोरण आखण्याची गरज आहे, अन्यथा नागरिकांना येणाऱ्या काळात आणखी बिकट परिस्थितीला सामोरे जावे लागेल.

## केज मध्ये अपघाताचा थरार !

# पुढे येईल त्याला धडकत सुटले भरधाव वेगातील कंटेनर अपघाता एक महिलेचा जागीच मृत्यू तर २५ पेक्षा जास्त जखमी

प्रतिनिधी । केज

केज शहरात दुपारी ३:०० च्या सुमारास एक भरधाव कंटेनर रस्त्यात भरधाव वेगात धावत होते आणि समोर जे येईल त्याला चिरडीत होते. या अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला असून पंचवीस जणांपेक्षा जास्त जखमी झाले आहेत. सदर कंटेनर युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी अडविण्याचा प्रयत्न करूनही ते थांबले नाही. ते एका वळणावर पलटी झाले. ते कंटेनर पलटी होताच कंटेनरला आग लागली.

या बाबतची माहिती अशी की, दि. १६ मे रोजी की, नेकनुरकडून एक भरधाव वेगात कंटेनर क्र. (डी डी- ०१/झेड-९७७१) येत असल्याची माहिती नेकनुर पोलिसांनी केज पोलिसांना दिली. ते कंटेनर अडविण्यासाठी केज पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक वैभव पाटील, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस उपनिरीक्षक राकेश बनसोडे, वाहतूक शाखेचे शहा, पाशा, शिवाजी कागदे, आणि इतर पोलिस हे चौकात थांबले होते. मात्र भरधाव वेगातील कंटेनरने शिक्षक कॉलनी जवळ असलेल्या होंडा शो- रूम जवळ एका टमटम क्र. (एम एच- २३/एच- ५४५) याला जोराची धडक दिली. त्यातील प्रवाशी जखमी झाले. त्या नंतर पुढे त्या कंटेनरने शासकीय विश्राम गृहा समोर उभ्या असलेल्या मोटार सायकल क्र. (एम एच- ४४/ए डी- १४६०) आणि क्र. (एम एच- ४४/ए सी- ५८१४) याला दोन मोटार सायकलींना धडक दिली.








त्या नंतर जुन्या उपविभागीय पोलिस उपअधिक्षक कार्यालया समोर रस्त्याने चालत असलेल्या मीना प्रवीण घोडके वय ३७ वर्ष (रा. चिंचोलीमाळी ता. केज) या महिलेला चिरडले. यात तिचा जागीच मृत्यू झाला. त्या नंतर धारूर चौकात उभ्या असलेल्या एका कार क्र. (एम एच- २३/ए एस- ०८९७) ला धडक दिली. त्या नंतर ते तसेच पुढे गेले. त्या नंतर चंदनसावरगाव येथेही दोघांना धडक दिली. या दोघे जखमी झाले आहे.

त्यानंतर युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे, पोलिस उपनिरीक्षक राहुल पतंगे, बालासाहेब घोरपडे, राऊत, आतकरे, डोंगरे, जाधव, हनुमंत गायकवाड यांनी रस्त्यावर अडथळे लावून ते कंटेनरला रोखण्याचा प्रयत्न केला परंतु सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. त्या नंतर सदर कंटेनर हे लोखंडी सावरगाव येथील कळंब कडे जाणाऱ्या चौकात पलटी झाले आणि त्याला आग लागली.अपघातातील जखमीवर केज येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रथमोपचार करून त्यांना संदर्भिय सेवेसाठी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथे हलविले असून त्यांच्यावर तेथे उपचार सुरू आहेत.

या अपघातातील जखमी :-

१) कृष्णा हरिदास कापरे वय २० वर्ष, (रा. कापरेवाडी ता. केज), २) श्रद्धा मधुकर चिंचकर वय १८ वर्ष (रा. येवता ता. केज),३) सुनील सुंदर घुले वय ५९ वर्ष (रा. केळगाव ता. केज), ४) बळीराम आप्पराव पांचाळ वय ४० वर्ष (रा. ढाकेफळ ता. केज), ६) सोनू बाबु शेख वय २० वर्ष (रा. केज), ७) विकास वसुदेव काकडे वय २२ वर्ष (रा. कापरेवाडी ता. केज), ८) कुमार गायकवाड ५५ वर्ष (रा. देवगाव ता. केज), ९) शेषेराव मारुती चंदनशिवे वय ५५ वर्ष (रा. शिरपुरा ता. केज), १०) सरिता रावसाहेब मुंडे ५७ वर्ष (रा. चारदरी ता. धारूर), ११) फुलाबाई धोंडीराम सावंत वय ६० वर्ष (रा. तुगाव ता. अंबाजोगाई), १२)

रावसाहेब यादवराव मुंडे वय ७९ वर्ष (रा. चारदरी ता. धारूर), १३) विद्या विलासराव सूर्यवंशी वय ३० वर्ष, (रा. पिसेगाव ता. केज), १४) विलासराव ज्ञानोबा सूर्यवंशी वय ४० वर्ष (रा. पिसेगाव ता. केज), १५) सिद्धेश्वर वसुदेव कापरे वय २२ वर्ष (रा. युसुफवडगाव ता. केज), १६) पोलिस कॉन्स्टेबल सिद्धार्थ शिंदे वय ३० वर्ष रा. युसुफवडगाव ता. केज), १७) अतुल बाबुराव कुलकर्णी, वय ४० वर्ष (रा. तांबवा ता. केज), १८) आशालता मुंडे वय ५० वर्ष (रा. चारदरी ता. धारूर), १९) बाबासाहेब देशमुख वय ४५ वर्ष (रा. बोरीसावरगाव ता. केज), २०) सौ. देशमुख ( बाबासाहेब देशमुख यांची पत्नी) वय ४० वर्ष (रा. बोरीसावरगाव ता. केज) आणि २१) शेख वय ३० वर्ष (रा. केज)

पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे थोडक्यात बचावले :- अपघातातील भरधाव वेगातील कंटेनर हे केज येथील धारूर चौकात येत असल्याची माहिती मिळताच त्याला अडविण्यासाठी पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे हे रोडवर येऊन थांबविण्याचा प्रयत्न केला परंतु ते कंटेनर सरळ अंगावर येत असल्याने त्यांनी प्रसंगावधान राखून चपळाईने बाजूला झाले त्यामुळे ते थोडक्यात बचावले !

केजला हवाय रिंग रोड :- केज शहरातून दोन हाय- वे जात असल्याने आणि शहरात मोठी गर्दी असते. तसेच वाहने व दुचाकी रस्त्यावर उभ्या कराव्या लागतात. यामुळे अशा घटना टाळण्यासाठी शहरा बाहेरून एखादा रिंग रोडची आवश्यकता आहे.कंटेनर चालक जखमी :- कंटेनर पलटी.झाल्या नंतर त्याचा चालक जखमी झाला असून त्याच्यावर अंबाजोगाई येथे उपचार सुरू आहेत.

# परभणीत ग्राहकांची घोर फसवणूक

## ऐन लग्न सराईत करोडो रुपये घेऊन ज्वेलर्सने केला पोबारा



प्रतिनिधी । परभणी

जिल्ह्यातील जिंतूर शहरात ऐन लग्नसराईच्या कालावधीत एका ज्वेलरी दुकानदाराने अनेक ग्राहकांची करोडो रुपयांची आर्थिक फसवणूक केली असून त्याने रात्रीच्या वेळी पोबारा केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.बालाजी ज्वेलर्स असे फसवणूक करणाऱ्या ज्वेलर्सचे नाव असून अनेकांनी त्यांच्यावर विश्वास ठेऊन दागिने बनवण्यासाठी त्यांना करोडो रुपयाची रोख रक्कम आगाऊ (अनामत) म्हणून अगोदरच अदा केली होती. दरम्यान, त्यांने आपले बालाजी ज्वेलर्स नावाचे दुकान अचानक बंद करून तो फरार झाल्यामुळे शहरात सर्वत्र प्रचंड खळबळ माजली गेली. ही बाब समजताच असंख्य संतप्त ग्राहकांनी दुकानासमोर मोठी गर्दी केली. परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

सराफाने केला ग्राहकांचा विश्वासघात.दागिन्यांचे पैसे अगोदरच अनामतच्या माध्यमातून घेऊन तो रात्रीच पसार झाल्याचे लक्षात येताच अनेकांचा त्याने विश्वासघात केल्याचे पुढे आले आहे. गुरुवार, दि.१५ मे रोजी रात्री ९:४५ च्या सुमारास ही घटना उघडकीस आली. पोलिसांना या घटनेची भणक लागताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत गर्दीवर नियंत्रण मिळवले. दरम्यान, आपली घोर फसवणूक झाल्याचा आरोप करत अनेक ग्राहकांनी पोलिसांत तक्रार दाखल करण्याची तयारी असल्याचे बोलून दाखवले. या प्रकरणात संबंधित दुकानदारासह त्याच्या कुटुंबीयांशी सुध्दा संपर्क होत नसल्याने हे प्रकरण अधिकच गंभीर बनले गेले आहे. फसवणुकीची घटना समोर आल्याने ग्राहकांचा संताप अनावर होऊन त्याचा कधीही मोठा भडका होऊ शकतो. परिणामी सदर ज्वेलर्स विरोधात संपूर्ण शहरात रोष पसरला गेला असून तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. खेदाची बाब म्हणजे ऐन लग्न सराईत विवाह सोहळ्यांच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांनी आपल्या बचतीचे पैसे विश्वासाने त्यांना दिले होते. त्यामुळे अनेकांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. सदर चिंताजनक घटनेमुळे अनेक कुटुंबांना केवळ आर्थिकच नव्हे तर भावनिक आणि मानसिक धक्का बसला आहे. या प्रकरणी पोलिसांतर्फे चौकशी सुरू असून नागरिकांतून जलद आणि कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.

# नियतीचा घाला.. लग्नाच्या सात दिवस आधीच जामखेडच्या खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टरचा अपघातात मृत्यू

जामखेड ।प्रतिनिधी

जामखेड तालुक्यातील नाहूली येथील एका तरुणासोबत अत्यंत हृदयद्रावक घटना घडली आहे. घरात या तरुण खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टरचे सात दिवसांवर लग्न आलं असतानाच त्याचा जामखेड-खर्डा रोडवर ट्रॅक्टर व मोटारसायकलच्या आपघातात मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

लग्न घरात लग्नाची धामधूम सुरु होती. पाहुणे मंडळींना पत्रिका वाटप सुरु होतं. दि २३ मे रोजी म्हणजे सात दिवसांवर लग्न आल्याने घरात लग्नाची तयारी आणि आनंदाचं वातावरण होतं. तेवढ्यात काळाने आपला घाला घातला, याबाबत अधिक माहिती अशी की मयत पशुवैद्यकीय डॉक्टर प्रल्हाद जाधव (वय २४) रा. नाहुली हा आज शुक्रवार दि. १६ रोजी सकाळी



जामखेड वरून जनावरांची औषधे घेऊन आपल्या नाहुली गावी चालला होता. या दरम्यान खर्डा रोडवरील एका पेट्रोल पंपाजवळ वीट वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला ओव्हरटेक करताना आपघात होऊन पशुवैद्यकीय डॉक्टर तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्याला ताबडतोब उपचारासाठी जामखेड येथील खाजगी दवाखाना घेऊन गेले मात्र पुर्वीच त्याचा मृत झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

डॉ. जाधव हा दोन वर्षांपासून मुक्या प्राण्याची सेवा करत होता. दोन वर्षापासून तो खाजगी पशुवैद्यकीय डॉ. म्हणून परिसरात प्रसिद्ध होता. जामखेड तालुक्यातील नाहुली येथील प्रल्हाद जाधव याने काही दिवस जामखेड शहरातील एका मेडिकल मध्ये नोकरी केली होती. यानंतर दोन वर्षांपूर्वी व्हिटरनरी कोर्स केला व व्यवसाय सुरू केला. आत्यंत गरीब परिस्थितीत त्याने व्यवसायात चांगला जम बसवला होता.

डॉ. प्रल्हाद जाधव यांचे येत्या २३ रोजी लग्न होते घरात लग्नाची तयारी चालली होती. आणी नियतीने जाधव कुटुबियांवर अघात केला आहे. डॉ. जाधव यांच्या मागे आई वडील व एक लहान भाऊ असा परिवार आहे. सध्या जामखेड पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# धारूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट



## गारपीटने आंबा पिक व सोलर प्लेट चे नुकसान

प्रतिनिधी । वाल्हे गंगाधर

धारुर तालुक्यात तांदळवाडी गांजपूर चिंचपूर चोरंबा ,आसोला, गोपाळपूर, जहागीर मोहा,आवरगाव , आरणवाडी, मैंदवाडी पिंपरवाडा भोगलवाडी,रुई आसरडोह अंजनडोह अशा अनेक गावांमध्ये सलग तीन दिवस वादळी वारे जोरदार वाहून झाडांचे नुकसान झाले आहे तसेच शेतकऱ्यांच्या तोंडात आलेला घास निसर्गाने घेतला असून यामध्ये आंबे फळबागाचे देखील अतोनात नुकसान झाले आहे. तसेच आसोला येतील शेतकरी निवृत्ती यादा चोले यांच्या शेतामध्ये सोलार प्लेट बसवण्यात आलेल्या होत्या यावर देखील गारपिट झाल्याने सोलार प्लेटचे नुकसान झाले आहे. वादळी वारे व अवकाळी पावसामुळे शेतकरी हात बंद झाला आहे. विविध आंबे फळबागाचे पंचनामे व सोलार प्लेटचे झालेले नुकसान याचा देखील पंचनामा करण्यात यावा तसेच नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# सिमेंट रस्त्यांवर डांबर टाकून खड्डे बुजवण्याचा प्रयत्न -ॲड. जीवनराव देशमुख

राष्ट्रवादी काँग्रेसकडून आंदोलनाची चेतावणी

परळी (प्रतिनिधी)

परळी शहरात नगरपालिकेच्या वतीने सिमेंट रस्त्यांवरील खड्डे डांबर टाकून बुजवण्याचा प्रकार सुरू असून, यामागे केवळ पालकमंत्र्यांच्या दौऱ्यानिमित्त शहरातील रस्त्यांची डागडुजी दाखवून मलिदा लाटण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) तर्फे करण्यात आला आहे.शहरात तीर्थक्षेत्र विकास, नगरोत्थान योजना आणि विविध योजनांतून कोट्यवधी रुपये आले असतानाही रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. विशेष म्हणजे, सिमेंट रस्त्यांवर डांबर टाकून खड्डे बुजवण्याचे काम सुरू असून, हे केवळ पालकमंत्र्यांसमोर शहराची प्रतिमा चांगली भासावी म्हणून केले जात आहे. त्यामुळे सिमेंट रस्त्यांवरील डांबर स्पॅचिंगसाठी बिल काढून पुन्हा आर्थिक बोजा टाकण्याची तयारी सुरू असल्याचा आरोपही या पक्षाकडून करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी शहराध्यक्ष ॲड. जीवन देशमुख यांनी मागणी केली आहे की, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक यांनी सदरील प्रकाराची गंभीर दखल घ्यावी. सिमेंट रस्त्यावर डांबर टाकण्याचे कोणतेही बिल मंजूर करू नये. तसेच रस्त्यांच्या दुरवस्थेस जबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी आणि त्यांच्याकडून झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली करून दंड आकारावा.या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) परळी शहरात तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही ॲड. जीवन देशमुख यांनी दिला आहे.





आज नाशिकमध्ये नामदार श्री गिरीश भाऊ महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त मध्यमंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये मध्य मंडळाच्या वतीने २७८ बॅगांचे संकलन झाले. मध्य मंडळातल्या सर्व रक्तदात्यांचे आणि पदाधिकारी कार्यकर्त्यांचे मनापासून आभार.

# नवीन बदल घडवण्याची क्षमता शैक्षणिक धोरणात आहे -ह.भ.प.चैतन्य महाराज देगलुरकर

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेतून उत्तम भारतीय नागरिक घडवणारे संस्कार दिले जात असल्याने संस्थेचा नावलौकिक उच्च स्तरावर जावुन पोहोचला आहे जुनी कात टाकून नविन बदल घडविण्याची क्षमता शैक्षणिक धोरणात असल्याचे मत ह.भ.प.चैतन्य महाराज देगलुरकर यांनी केले. येथील खोलेश्वर मा. शाळेच्या इमारत भुमीपुजन प्रसंगी बोलत होते.व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर,कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य,स्थानिक अध्यक्ष विजय वालवडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

चैतन्य महाराज पुढे बोलताना म्हणाले की,ज्ञान मंदिर बांधकामाचा शुभारंभ माझ्या हस्ते होणं हा पुण्यकर्माचा भाग म्हणावा लागेल परीक्षार्थी विद्यार्थी घडवणे त्यापेक्षा ज्ञान अंत:करणात गेले तर मुला-मुलींच्या व्यक्तिमत्वाचा विकास तर होतोच त्यातून राष्ट्रहित देखील साध्य होते सनातन धर्माच्या संस्कृतीत




परिवर्तन घडवण्याचा संकल्प आणि उद्देश अतिशय चांगला असल्याचे त्यांनी सांगितले. ज्ञानाची प्राप्ती होते ही काळाची गरज आहे शाळेची इमारत भव्य दिव्यतेने निर्विघ्न पुर्णत्वाकडे जाईल असे आशिर्वादही त्यांनी दिले.

कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य म्हणाले की, शिक्षण संस्था चालवताना भौतिक सुविधा काळाची गरज असुन वर्तमानकाळात ठिकठिकाणी बांधकाम प्रगतीपथावर असल्याचे सांगुन खोलेश्वरची भव्य इमारत पुर्ण होईल असा विश्वास व्यक्त केला. अध्यक्षीय समारोपात डॉ.आलुरकर यांनी सांगितले की, भाशिप्र संस्था आता परिवर्तनाच्या दिशेने जात असुन गुणवत्तेत आघाडी, तशी भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी देखील संस्था कार्यकारी मंडळ संकल्पित विचाराने पुढे जात असल्याचे ते म्हणाले.किरण कोदरकर यांनी प्रास्तविक केले संचालन प्रा.दत्तप्रसाद गोस्वामी, आभार उन्मेष मातेकर यांनी मानले.यावेळी माजी प्राचार्य राजाभाऊ धाट, डॉ.शरद हेबाळकर, बिपीन क्षीरसागर, चंद्रकांत मुळे,राम कुलकर्णी, उमेश जगताप,डॉ.अतुल देशपांडे,अविनाश तळणीकर,बाबुराव आडे,आप्पाराव यादव, शरयु हेबाळकर, वर्षा मुंडे,कि.ना.महामुनी, प्रा.अशोक पाठक,डॉ. प्रसाद कुलकर्णी, प्रा.अविनाश जोशी,राहुल कुलकर्णी, प्रसिद्ध वास्तु रचनाकार दिनेश पुरी यांच्यासह संकुलातील शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

# श्री विनायकराव माध्यमिक विद्यालयाचे दहावीच्या परीक्षेत घवघवित यश

बीड (प्रतिनिधी)

श्री विनायकराव माध्यमिक विद्यालय, वैद्यकिन्ही ता.पाटोदा जि. बीड या शाळेने नुकत्याच घोषित झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत उज्वल यश मिळवले असून शाळेचा निकाल १००% टक्के लागलेला असून विद्यालयातून कु. जोगदंड सुजाता बबन ९३.४०% गुण घेऊन सर्वप्रथम आली आहे. चिरंजीव. बांगर विशाल त्रिंबक ९३% टक्के गुण घेऊन दुतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. चि. बावणे पार्थ मधुकर ९२.२० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे.

या शिवाय कु. बावणे अंकिता सिताराम ९२% ची. ओमकार विष्णू आजबे ८९ % कु. बांगर राजश्री रामकिसन ८८.८०% चि. येडे वैभव कुंडलिक ८८ ६०% कु. कदम पुनम भास्कर ८७. ४०% याप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले असून सदरील यशाबाबत संस्था सचिव भागवत (अण्णा) आजबे संस्था अध्यक्ष बाजीराव (अण्णा) बांगर संस्था पदाधिकारी मुख्याध्यापक श्री. बांगर सर व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

# खंदारे गुरुजींची गुरुवचने






डॉ संगिता पिंगळे
बीड

भक्ताचे काम करताना जो बेजार होत नाही तो देव आहे असे गुरुजी म्हणाले.

भक्ताचे काम करताना जो बेजार होत नाही तो देव आहे असे गुरुजी म्हणाले. जनाबाई सोबत भांडी घासणे, केर भरणे, दळण दळणे,चोखोबाचे गुरे राखणे, कूर्मदासासाठी पंढरपुर सोडून त्याला अंतिम क्षणी भेट देतो, सोयराबाईची नणंद बनून प्रसूती करतो ,गुरुजी ज्याला माझा म्हणाले त्याचे सगळे छोटे मोठे कार्य विनाविलंब करतो असा हा ब्रम्हांडनायक स्वतः चेही विस्मरण झालेल्या पुंडलिकाला स्वतः हून विठ्ठल रुक्मिणी रुपात भेटायला येतो अन युगे युगे एका विटेवर अखंड उभा आहे तरीही बेजार मात्र नाही अन त्याचे नाव देव आहे. देव म्हणजे देणारा, तो प्रेम देतो ते प्रेमासाठी, बाकी त्याला काय उणे आहे. त्याच्या प्रेमाचा छोटासा कण अनुभवण्यासाठी चोखामेळा पंढरपुरात येतात अन गातात बहु भुकेला झालो ,तुमच्या उष्टयासाठी आलो ,जोहार मायबाप जोहार .गुरुजी तुम्हीही विठ्ठलाप्रमाणे आमच्यासाठी खूप पराकाष्ठा केलीत पण कधीच बेजार झाला नाहीत, तुम्ही नेहमी आमचे उत्तर आहात. थँक्स गुरुजी, बहु कृपा केली. आपला नित्य जयजयकार असो.

# महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्याद्वारे खरीप हंगाम पूर्व नियोजन तसेच मोहिमा राबवण्याचे उद्दिष्ट

केज /प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्याद्वारे खरीप हंगाम पूर्व नियोजन तसेच मोहिमा राबवण्याचे उद्दिष्ट असून याचाच भाग म्हणून तालुका कृषी अधिकारी केज श्री सागर पठाडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण तालुका भरात विविध मोहिमा राबविण्यात येत असून आज दिनांक१५/०५/२०२५ रोजी मौजे येवता येथे मंडळ कृषी अधिकारी केज यांच्यामार्फत मोहीम राबवण्यात आली. यावेळी कृषी विभागाच्या ३० कलमी कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या विविध मोहिमा राबवण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून आज शेतकऱ्याकडे उपलब्ध असलेले सोयाबीन बियाणे व त्यांची उगवण क्षमता चाचणी तपासणी याबाबत प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आली तसेच बीज प्रक्रिया व माती परीक्षण याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले, तसेच या गावातील महिला बचत गटांचे विविध योजनेत सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने सेंद्रिय शेती चे महत्व सांगून याद्वारे सेंद्रिय गट निर्मिती करण्याची संकल्पना सुचविण्यात आली. यावेळी मंडळ कृषी अधिकारी श्री प्रदीप कोठावळे यांनी बियाणे उगवण क्षमता त्याचे महत्त्व आणि गरज याबाबत सविस्तर असे मार्गदर्शन केले यावेळी त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवत असताना शंभर बिया कशा प्रमाणे सुतळी बारदाना गोणी घेऊन ती पाण्यात बुडवून ओली करून अंथरून घ्यावी व त्यावर दहा उभ्या रांगा व दहा आडव्या रांगेत बियाण्याची मांडणी करून प्रात्यक्षिक करून दाखवले यावेळी बीज प्रक्रिया तसेच उपलब्ध बियाण्याचा वापर केल्यामुळे आपल्या होणाऱ्या खर्चामध्ये कशी बचत होते व उत्पादनामध्ये कशी वाढ करण्यात मदत होते याबाबत तसेच कृषी विभागामार्फत फळबाग लागवड योजना चा लाभ घेण्याचे आव्हान श्री सुभाष



शेंडगे कृषी पर्यवेक्षक यांनी मार्गदर्शन केले यावेळी बचत गटांच्या महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला या कार्यक्रमात प्रात्यक्षिक श्री संजू गायकवाड कृषी सहाय्यक येवता यांनी करून दाखवले व शेतकऱ्यांना खरीप हंगामात कशा विविध योजना द्वारे आपल्याला लाभ मिळेल व कृषी विभागाच्या विविध योजना याबाबत मार्गदर्शन केले, या कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी केज अंतर्गत विविध सज्जाचे कृषी सहाय्यक श्री घाटुळे, ज्ञानेश्वर जाधव, श्रीमती आर बी पवार व श्रीमती एच.डी.चाळक याही उपस्थित होत्या तसेच यावेळी महिला बचत गटाच्या अध्यक्षा व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या तसेच सदरील कार्यक्रमास या गावातील प्रतिष्ठित नागरिक व इतर मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शन श्री ज्ञानेश्वर जाधव यांनी केले



# जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने अपात्र ठरवलेल्या सरपंच/सदस्य यांना पुन्हा तात्काळ पदभार द्या

प्रा.ईश्वर मुंडे यांचा जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा

बीड : स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी निवडणूक दिनांका पासून एका वर्षाच्या आत आपले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक होते.मात्र काही सरपंच व सदस्यांनी विहित कालमर्यादेत प्रमाणपत्र सादर न केल्याने जिल्हाधिकारी बीड यांनी ज़िल्ह्यातील अनेक सरपंच व सदस्य यांना अपात्र ठरवले होते. राष्ट्रावादी काँग्रेस चे नेते प्रा.ईश्वर मुंडे व सरपंच परिषदेचे दत्ता काकडे यांनी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा केल्याने महामहीम राज्यपाल यांनी दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध केल्या राजपत्रानुसार सर्व संबंधितांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी एक वर्षाचा वाढीव कालावधी दिलेला आहे.

तरी यापूर्वी अपात्र ठरवण्यात आलेले सरपंच,सदस्य व इतर पदाधिकारी यांना पूर्ववत कार्यरत ठेवण्यासाठी नव्याने आदेश काढून अपात्र ठरवलेल्या सर्व सरपंच, सदस्यांना तात्काळ पूर्ववत पदभार द्यावा अन्यथा दि. १९ मे २०२५ पासून जिल्हाधिकारी,बीड कार्यालयासमोर सर्व सबंधितांना सोबत घेऊन आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा लेखी निवेदनाद्वारे काँग्रेस पार्टीचे नेते प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे,सुनील पाटील,राम आबुज,भरत मते,उध्दव पैठणे,यांच्या शिष्ट मंडळाने विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी,बीड यांना दि.१६ मे २०२५ रोजी प्रत्यक्ष भेटून दिला आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब यांनी निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय : दैनिक मराठवाडा दर्शन, माधव नगर, धारूर रोड, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PUBLISHED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB ON BEHALF OF HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PRINTED AT NIRMITEE PRINTS, KABAD GALLI, BEED TQ.DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT.THE OFFICE OF DAILY MARATHWADA DARSHAN, At.MADHAV NAGAR, DHARUR ROAD, KAIJ TQ.KAIJ, DIST.BEED ( MAHARSHTRA).
EDITOR- HANDIBAG DATTATRAY BALASAHEB